# प्रेसनोट

दि.२७/०३/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.३१०/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सचिन पांडुरंग खताळ, वय–३८ वर्ष, धंदा–नोकरी, दुय्यम निबंधक श्रेणी १, वर्ग–३, दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | आरोपी लोकसेवक खताळ यांनी तक्रारदार यांना आजच्या दस्ताबाबत सकाळी तुमच्याशी बोलण झाल आहे, तुम्ही तुमच्या हिशोबाने दया, असे म्हणुन लाचेची मागणी केली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे वकील असून जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. तक्रारदार यांनी स्वत: व इतर २७ यांनी श्रीगोंदा येथील गट नंबर ११७१ मधील ५ हेक्टर ६८ आर क्षेत्रापैकी २८ आर जमीन विकत घेतली होती. त्याचा दस्त दि.२८/२/२०२५ रोजी केलेला होता. त्यानंतर दि.२६/३/२०२५ रोजी तक्रारदार तसेच त्यांचे पार्टनर यांनी श्रीगोंदा येथील गट क्रमांक ११७१ मधील २० आर क्षेत्रापैकी त्यांचे पार्टनर यांचे अविभाज्य हिस्याची पूर्ण विक्रीचे १ आर क्षेत्र दुस–यांना ५०,०००/– रुपयास विक्री केल्याबाबतचा दस्त नोंदविण्याकरीता तक्रारदार यांना दुय्यम निबंधक कार्यालयात देण्याकरीता त्यांच्याकडे दिला होता.त्यावेळी तक्रारदार यांनी सदरचा दस्त दुय्यम निबंधक खताळ यांच्याकडे दिला.त्यावेळी खताळ यांनी आजच्या दस्ताचे ५०००/– रुपये व दि.२८/२/२०२५ रोजी नोंदविलेल्या दस्ताचे १०,०००/– रुपये लाच मागणी केल्याबाबतची तक्रार दि.२६/३/२०२५ रोजी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. सदर लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.२६/३/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक सचिन पांडुरंग खताळ यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचा समक्ष तक्रारदार यांना तुमच्या दि.२८/२/२०२५ रोजीचे दस्ताचे पैसे तुमचे पार्टनर देतील, आजच्या दस्ताचे बाबत सकाळी तुमच्याशी बोलणं झाले आहे, तुम्ही तुमच्या हिशोबाने दया असे म्हणुन लाचेची मागणी केली आहे. दि.२६/३/२०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथे आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक सचिन पांडुरंग खताळ, दुय्यम निबंधक यांनी तक्रारदार यांचेकडुन ५०००/– रुपयांची लाच स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर